# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## तक्रार क्रमांक २९६/ २०१६

महादेव दगडुजी सातपुत,
रा. नरसिंग शाळेमागे अकोट,
ता. अकोट, जि. अकोला

**तक्रारकर्ता**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा
नगर लेखापाल, नगर परिषद अकोट,
ता. अकोट, जि. अकोला

**उत्तरवादी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद अकोट,
ता. अकोट, जि. अकोला

| माहिती करिता अर्ज /दाखल दि. | प्रथम अपिल अर्ज व दाखल दि. | प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दि. | माहिती पुरविल्याचा दि. |
|---|---|---|---|
| ०३.०३.२०१६ | २४.०५.२०१६ | ३०.०८.२०१६ | - |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता 'ज.मा.अ.' तसेच प्रथम अपिलीय अधिकारी करिता 'प्र.अ.अ.'

तक्रार अर्ज व दाखल दिनांकः ०१.०८.२०१६
सुनावणी सूचना (नोटिस) दिनांकः ०६.०४.२०२२

**उपस्थित पक्ष:**

दिनांक १९.०४.२०२२ रोजी नांव व्यक्तीशः / प्रतिनिधी

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | महादेव दगडुजी सातपुत | व्यक्तीशः |
| वर्तमान ज.मा.अ. | योगेश प्र. मांवळे | व्यक्तीशः |

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा

दिनांकः **१९ एप्रिल २०२२**

## आदेश

१. तक्रारकर्ता यानी माहिती मिळविण्यासाठी त्यांचे तक्रार अर्जावर जन माहिती अधिका-याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे कळवून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खाली तक्रार अर्जावर आयोगानी अधिनियमाच्या कलम १८(२) अन्वये चौकशी व सुनावणी करण्याचे ठरविले.

२. तक्रारकर्ता यानी जन माहिती अधिका-यांकडून खालील माहिती मागितली आहे (जोडपत्र अ):

"रमाई आवास योजना अंतर्गत"

१. सन २०११, २०१२, २०१३, २०१४ ला प्रत्येकी अनुक्रम प्रमाणे प्राप्त निधी किती मिळाला (एकून टोटल किती, मंजूर उद्दीष्ट किती, त्यावर मार्च २०१६ पर्यंत खर्च निधी किती झाला आणि शिल्लक निधी किती लेखीत माहिती देणे.

(कालावधीः सन २०११ ते २०१४ पर्यंत; व्यक्तीशः)

३. ज.मा.अ. यांनी माहिती दिली नाही.

४. प्र.अ.अ. यांनी प्रपत्रात दि.३१.०८.२०१६ रोजी प्रथम अपिल आदेशाचा दिनांक नमुद केला आहे. मात्र आदेशाची प्रत जोडलेली नाही.

सुनावणी सूचना (नोटिस) वर लेखी निवेदन व सुनावणी

५. वर नमुद सूचने द्वारे सर्व संबंधितांना तक्रार अर्जाबाबत त्यांचे म्हणणे लेखी सादर करण्यास संधी देवून सुनावणीचा दिवस कळविण्यात आला. वर्तमान ज.मा.अ. योगेश प्र. मांवळे यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले आहेत. वर्तमान प्र.अ.अ. यांनी लेखी निवेदन सादर करण्याची संधी चा उपयोग केले नाहित.

६. ज.मा.अ. यांनी सुनावणी दरम्यान असे सांगितले की, अर्जदार यांना दि.२८.०२.२०२२ रोजी पत्राद्वारे माहिती पाठविली होती. मात्र अर्जदार यांनी पत्र घेण्यास नकार दिला, व पत्र परत कार्यालयात आला. तसेच त्यांनी सांगितले की आजरोजी माहिती सोबत आणली आहे.